KNOWLEDGE FLAME
E-ISSN: 3049-1541
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

# ग्रामीण कविता आणि शेतकरी आत्महत्या : एक ज्वलंत प्रश्न

प्रा. डॉ. सुधाकर भि. जाधव
सहयोगी प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक,
मराठी विभाग
स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मंठा, जि. जालना.

---

**प्रस्तावना**

भारतीय संस्कृतीचे मूळ क्षेत्र शेती संस्कृती हे आहे. भारतीय ग्रामव्यवस्था आणि ग्रामजीवन हे शहरांच्याही अगोदरची संस्कृती आहे. अशाप्रकारे हजारो वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या या खेड्यांमध्ये आजही भारतीय शेती संस्कृतीचे झरे वाहताना दिसतात. भारतीय स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण जीवनात शिक्षणाचे मूल्य रुजण्यास सुरूवात झाली. शिक्षणाच्या माध्यमातून लोकशाही मूल्य अभ्यासली जाऊ लागली. लोकशाही मुळे स्थानिक स्वराज्य संस्थाच्या माध्यमातून ग्रामपातळीवर राजकीय प्रभाव जाणवू लागला. शिक्षण, राजकीय प्रभाव, लोकशाहीची व्यवस्था, आधुनिकीकरण या सर्वांच्या प्रभावाने ग्रामजीवन ढवळून जात आहे. यातूनच ग्रामीण साहित्य आणि सामाजिक वास्तव यांचा एक अतूट संबंध तात्विक स्वरूपात जागृत होऊन मराठी ग्रामीण कवितेत सामाजिक जाणिवा ठळकपणे उमटू लागल्या. याच पार्श्वभूमीसंदर्भात डॉ. प्रल्हाद लुलेकर लिहितात, "७० च्या दशकात लिहिणारी पिढी या वास्तवाकडे पाहत होतीच. शेतकरी, बलुतेदार, अलुतेदार, शेतमजूर विपरीत स्थितीला सामोरे जात होते आणि नागरी भागातील लोक साऱ्या सुविधांचे लाभार्थी बनले होते. शेतीक्षेत्र प्रश्नांच्या आगीत होरपळत होते तर उद्योगक्षेत्र करसवलतीच्या लाभात लोळत होते. एका बाजूला वाढणारे दारिद्य, विषमता आणि भूक तर दुसऱ्या बाजूला उपभोग्य साधनाची मोहक उपलब्धता असे चित्र या दशकात निर्माण झाले. सेझसह विविध क्षेत्राची नीव व्यवस्था, नवी परिभाषा वापरून परिवर्तनाचे ढोल वाजविले जात होते. आजही ग्रामीण भागातील मूळ प्रश्न कायम आहेत." या संदर्भाने स्पष्ट होते की, शेती संस्कृतीतील ग्रामजीवनात असलेल्या मुळ समस्या तर होत्याच त्यात बदलत जाणाऱ्या सामाजिक परिस्थितीने विविध समस्यांना जन्म दिला. शेतकरी आत्महत्या, दुष्काळाचे सावट, पाणीप्रश्न, वीजप्रश्न, सरकारचे शेतीकडे झालेले दुर्लक्ष यातून सामाजिक समस्या मोठ्या

होतच गेल्या. याकडे ग्रामीण साहित्याने वास्तवपणे पाहत सामाजिक जाणिवाचे गंभीर स्वरूप १९८० च्या दशकात मराठी ग्रामीण कविंच्या काव्यातून आविष्करण केले, जातांना दिसून येते. शेती संस्कृतीच्या जीवनातील अनुभव, शेती संस्कृतीची मूल्ये, रूढी-परंपरा, श्रद्धा-अंधश्रद्धा, शेतकरी जीवनातील व्यथा या सर्वांच्या सुप्त जाणिवांनी प्रेरीत होऊन ग्रामीण समाजजीवनाचे ग्रामीण कविंनी त्यांच्या कवितेचा आशय प्रतिबिंबित केलेला दिसून येतो. खरीतर याची वाटचाल भारत स्वातंत्र्योत्तर कालखंडात सुरू झाली. मात्र ती १९८० च्या दशकात मराठी ग्रामीण कविंच्या कवितेमध्ये ठळकपणे आविष्कृत होताना दिसून येते. याच पार्श्वभूमीचा परामर्श मांडताना डॉ. वामन जाधव लिहितात, ""स्वातंत्र्योत्तर कालखंडात ग्रामीण साहित्याचा प्रवाह समृद्ध झाला. कृषी संस्कृतीतील अनेक घटकांवर साहित्यिकांनी लेखन केले. कथा, कविता, कादंबरी या सर्वच ललित वाङ्मयात बदलत्या ग्रामीण जीवनाचे प्रतिबिंब उमटू लागले. कित्येक दिवस अज्ञानाच्या छायेखाली वावरणारे, वेशीबाहेरचे आणि वेशीतले अनेक लोक उच्चशिक्षण घेऊ लागले. आपल्यावर लिहिलेले साहित्य हे आपले साहित्य नव्हे, असे त्यांना वाटू लागले. त्यांचे अनुभव साहित्यात येऊ लागले. परंपरेने आलेल्या साहित्यास हादरे बसू लागले. जे कधी ऐकले नाही, पाहिले नाही अशा मध्यमवर्गीयांना, शहरवासीयांना हे साहित्य नवे वाटू लागले. ग्रामीण जीवनातील रांगडे प्रेम, सत्तासंघर्ष, ग्रामीण जीवनातील उचापती, मर्यादा ओलांडणारे हे नवे साहित्य होते. हे साहित्य वाचून वाचक अस्वस्थ होत होता." मराठी ग्रामीण काव्यात ग्रामीण जीवनाचे विविध अंगाने अंतर्मुख करणारे व शेतकरी जीवनाचे वास्तव दर्शन घडवणारा आशय मांडण्यात आला. विशेषतः १९८० च्या दशकात मराठी ग्रामीण काव्यात बदलत्या ग्रामीण जीवनशैलीचे वास्तव तसेच ग्रामीण माणसाच्या मनातील ताणतणाव, समस्या, शेतकरी जीवनातील दुःख, दारिद्य व कर्जबाजारीपणा तसेच शेतकऱ्यांच्या आत्महत्या, राजकीय प्रभावाने ग्रासलेली गावं, शेतकरी स्त्रीयांची होणारी कुचंबना, हालअपेष्टा सर्वांच्या जाणिवा, सामाजिक जाणिवांचे रूप धारण करून मराठी ग्रामीण काव्यात प्रतिबिंबित झालेले दिसून येतात,

शेती संस्कृती

मराठी ग्रामीण कवितेत सामाजिक जाणिवांच्या अंगाने शेती संस्कृतीविषयक वास्तवतेचा विचार करतांना शेती संस्कृती या मुळ संकल्पनेभोवती असणारे विविध अंग जसे की, शेतकरी, शेतकरी कुटुंब, गाव, गाववस्ती, शेती संस्कृतीतील रीतिरिवाज, अस्मानी-सुलतानी संकट, नातीगोती, निसर्ग सण, पारंपरिक सण-उत्सव इत्यादी संबंधी जाणिवांचे प्रकटीकरण मराठी ग्रामीण कविंनी त्यांच्या काव्यात केलेले आहे. शेती संस्कृती विषयक जाणिवांकडे पाहताना जीवनातील व शेत शिवारातील सुख-दुःखाच्या प्रसंगांनाही मराठी ग्रामीण कवी ठळक रूपाने मांडताना दिसतात. यासोबतच शेती संस्कृतीतील अविभाज्य घटक म्हणजे गाव माणसात असणारा जिव्हाळा, प्रेम याही जाणिवा कवी ग्रामीण बोलीभाषेत सहजतेने मांडतात. यानुसार

शेती संस्कृतीविषयक जाणिवा पुढीलप्रमाणे, कवी ना. धों. महानोर त्यांच्या 'पानझड' या कवितासंग्रहातून शेती संस्कृतीविषयक जाणिवा ग्रामीण बोलीभाषेत सहजतेने मांडतांना दिसून येतात. शेती संस्कृतीतील निसर्ग, गावातील माणसं, देऊळ, निसर्गातील ऋतू, पावसाळा अशा अंगाने आशय मांडताना दिसून येतात. शेतीसंस्कृतीतील निखळ निसर्ग सौंदर्य हा त्यांच्या कवितेचा अत्यंत महत्त्वाचा आशय वाटतो. यासोबतच आधुनिक काळामध्ये ग्रामीण भागातील माणसा माणसांतील मायेचा ओलावा लुप्त होऊन जात आहे. याच्याही दुःखमय जाणिवा मांडताना कवी म्हणतात,

"कोणी मरो तरी ह्यांच्या आसनांचा खेळ महात्म्याच्या गाथेखाली पेटविला जाळ कुठे शोधावा माणूस रिते कोस कोस दूर गणगोत माझे शब्दही उदास' (पानझड - पृ.७)

यातून कवी ना. धों. महानोर ग्रामीण भागात कमी होत चाललेला जिव्हाळा माणसांमाणसांतील लुप्त होत जाणारा जिव्हाळा याचे चिंतन करावे अशा जाणिवांचा वेध घेताना दिसून येतात. तसेच कवी ना. धों. महानोर 'पानझड' या कवितासंग्रहातील पालखीचे अभंगांच्या माध्यमातून शेती संस्कृतीविषयांच्या जाणिवा स्पष्टपणे मांडतात. यामुळेच संजय चौधरी या विषयी लिहितात, 'पानझड' च्या तिसऱ्या भागात 'पालखीचे अभंग' आहेत. अभंग असले तरी शेताचे, रानाचे संदर्भ अटळपणे त्यांच्या कवितेत येतात. अभंगात मृगनक्षत्र, पिकांचा दरवळ, पाखरांच्या चोची, कुणब्याचा मळा, असे संदर्भ आहेत. रान आणि रानाच्या, शेताच्या जगातले सारे कविंच्या चिंतनाचा चिरंतन विषय आहे. दुष्काळाने रान करपावे तसे जगण्याच्या तप्त अनुभवांनी माझे मन पोळले आहे, असे मागणे पांडुरंगाकडे मागणारा कवी आपल्या माणसांचंच दुःख अखेरीस अभंगातून घेऊन येतो.

यावरून असे लक्षात येते की, मराठी ग्रामीण काव्यात कृषी संस्कृतीविषयक जाणिवांना अत्यंत महत्त्व प्राप्त झालेले आहे. याच अनुषंगाने डॉ. मधुकर वाकोडे लिहितात, 'कृषि आणि कृषकांप्रमाणे वाघांची कविता ही सर्जनशील कविता आहे. 'तिफण', 'वावर', 'पहाटी', 'पानी', 'ढगामुचूक अभाय' इ. कवितांमधून कृषिविषयक जीवनानुभवाचे अतिशय प्रत्ययकारी दर्शन त्यांनी घडविले. कृषिविषयक भावानुभवाने त्यांच्या कृषिरचनातील आशय निश्चितच नव्हे तर विस्तारितही झाल्याने त्यांच्या कवितेला सकस साहित्यमूल्य प्राप्त झाले आहे.'

काम करून पोट भरणाऱ्या माणसाची अवस्था वाईट झालेली आहे. सर्व सहन करण्याची क्षमता ओळखून मालक त्याला रोज सुनावतो. परंतु जगण्यासाठी त्याला सर्व सहन केल्याशिवाय पर्याय उरत नाही.

"पाटील गावचं तुमी लेकरू आपलंच मी पाठीवर मारा दोन खेटरं कसं ! पन मारू नका पोटाला गरिबाच्या, नाना असं

कवी विठ्ठल वाघ शेती संस्कृतीतील शेतकरी शेतात राबराब राबतो. तो त्याचे भविष्यातील स्वप्न पूर्ण करण्यासाठी हीच जाणीव मांडत कवी म्हणतात;

"कापसाचे गाठोडे डोळ्यातील अवघे

तिने करकचून बांधले

स्वप्न डोक्यावर उचलले' (कपाशीची चंद्रफुले पृ. २३)

शेती संस्कृतीत पिकणाऱ्या पिकावर, धनधान्यावर शेतकरी कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. पीक उत्तम आले तर मनात असलेले प्रगतीचे स्वप्न सकारता येतात. या कृषिविषयक जाणिवा कवी विठ्ठल वाघ सहजतेने साकारताना दिसून येतात. याचप्रमाणे कवी इंद्रजित भालेराव शेती संस्कृतीतील रात्रंदिवस कष्ट घेणाऱ्या शेतकरी वडिलाचे चित्रण करताना म्हणतातः

"गाव घालितो खेकाट्या । बाप राबाते मुकाट्या दाती घाली दातखीळ । पाडी आतड्याला पीळ रक्तशिरा आटलेल्या । मेचकीत गोठलेल्या ऊर बसला कामानं । तरी धजतो जोमानं' (पीकपाणी- पृ.२)

शेती संस्कृतीच्या वास्तवता मांडताना शेतशिवार, गावातील माणसं, पाऊसकाळ, शेतावर असलेली निष्ठा अशा विविध अंगांनी कृषिसंस्कृतीचे चित्रण कवी श्रीकांत देशमुख यांच्या काव्यातही येते. श्रीकांत देशमुख यांच्या 'बळिवंत' या कवितासंग्रहात ग्रामीण जीवन जगण्याच्या पद्धतीचे बारकाव्याने चित्रण आलेले आहे. शेती संस्कृती जीवन जगण्याची एक स्वतंत्र परंपरा असते. गावातल्या माणसामाणसातल्या जिव्हाळ्यासोबत शेतशिवारातील देव देवता आणि निसर्गदेवता यांच्याशी अतूटपणे जुळलेले नाते असते. शेती संस्कृतीतील निसर्ग हा संपूर्ण शेतकरी जीवनाचा पोशिंदा असतो. यासोबतच शेतशिवारातील रानपाखरं, पशु, प्राणी, यांचेही संगोपन होत असते. शेतातील पशुधन म्हणजेच गाय, बैलजोडी, म्हैस यांचेही अतूट नाते असते. यामुळेच शेती संस्कृतीच्या जाणिवांमध्ये शेतशिवार, पशुपक्षी प्राणी यांच्या संबंधी प्रेमभावना आणि ऋण व्यक्त करण्यातून पोळा, वटपौर्णिमा, लक्ष्मीपूजन, नागपंचमी इत्यादी निसर्गाच्या सानिध्यात सण साजरे केले जातात. या सर्वांच्या विषयीची कवी मनातली तळमळ कृषि जाणिवांच्या माध्यमातून काव्यात प्रकट होते.

शेती संस्कृतीतील अविभाज्य घटक असलेल्या गावासंबंधीच्या जाणिवा सहजतेने मांडताना दिसून येतात. यास्तव डॉ. पृथ्वीराज तौर लिहितात, "श्रीकांत देशमुख यांच्या कवितेचा आत्मस्वर हा कृषिजीवनाचा आहे आणि त्यामुळे कृषिजीवनाशी संबंधित प्रत्येक घटक त्याच्या एकूण अस्तित्वानिशी देशमुखांच्या कवितेतून प्रकट होतो. गाव, गावमाणसं, घरं, झाडं, प्राणी, देवता, पाऊस-पाणी, दुष्काळ, चाली-रिती, निसर्ग, ऊन अंधार, शांतता या सगळ्या चैतन्याला ही कविता

व्यक्त करते. हे व्यक्त करणं निव्वळ पृष्ठस्तरीय नाही, तर संबंध इतिहासकालीन परंपरा कोळून-एकवटून अपरिहार्य म्हणूनच या कवितेतून पुढं येतात. कवितेतील प्रत्येक शब्द त्यांच्या सांस्कृतिक-सामाजिक-राजकीय अर्थासह त्यांच्या नाद लयीच्या रूपबंधासह या कवितेत भेटतो. मध्यभागी लोकवस्ती व सभोवताली शेती असलेलं केंद्रीय पद्धतीचं खेडं श्रीकांत देशमुखांनी आपल्या कवितांमधून उभं केलेलं आहे. एकत्र कुटुंबपद्धतीचं स्थितिशील, परंपरावादी असं हे खेडं आहे. नातेसंबंधाचा ओलावा असला तरी भौतिक दारिद्यानं खंगलेलं हे खेडं आहे. गढी असलेलं, माड्या असलेलं, वेस असलेलं, गावकुळा आणि निश्चित अशी शिव असलेलं हे खेडं आहे. जमिनीशी निगडित व्यवहार करणारं आणि मुळात शेतीवर, पाऊस पाण्यावर अवलंबून असलेलं हे खेडं आहे.

शेती संस्कृतीतील जीवनाचे जगणे निसर्गावर अवलंबून आहे. पाऊस वेळेवर होऊन शेतीत यावर्षी पीक चांगलं येईल अशी शेतकऱ्याला आशा असते. मात्र निसर्गाच्या लहरीपणामुळे पावसाचे प्रमाण कमी-जास्त होते. त्यातून शेतकऱ्याला नापिकीला सामोरे जावे लागते. पाऊस दरवर्षी समप्रमाणात चांगला व्हावा यासाठी वनीकरण व वनशेती याला वेळोवेळी शासनाने महत्त्व दिलेलेच आहे. आजची शेती ही केवळ नैसर्गिक पावसावर अवलंबून राहून जमत नाही तर त्यासाठी काही उपाययोजना करणे देखील आवश्यक आहे. शेतीला मशागत आणि मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध नसेल तर शेतीतून कोणतेच उत्पन्न फारसे निघणार नाही. त्यामुळे शेतीला महत्त्वाचे जे काय असेल ते देणे तितकेच महत्त्वाचे आहे कारण भारत हा कृषिप्रधान देश आहे आणि या देशात शेती पिकली तरच देशाचे भवितव्य अवलंबून असेल. त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे डोळे झाक न करता त्यांचे प्रश्न तात्काळ सोडण्यासाठी प्राधान्याने विचार करावा लागतो आणि तो प्रशासनाने केला पाहिजे. यासंदर्भात अनेक मराठी ग्रामीण कवी व कवयित्रींनी आपल्या लेखनामध्ये या संदर्भात विचार मांडलेले आहेत. त्यामुळे शेती कसणे हे फार मोठे आव्हान निर्माण झालेले आहे त्यासाठी शासनाने शाश्वत विकासाची व योजनांची अंमलबजावणी करणे आवश्यक वाटते. या संदर्भात वा अनुषंगाने मोहन धारिया म्हणतात, 'शेताजवळ झाड नको हा गैरसमज सर्वत्र रूढ झाला आहे. झाडाची छाया पडल्यास पिकांना त्रास होतो हे खरे आहे परंतु ती काळजी घेऊन बांधावर सरळ जाणारी अथवा बोर, पेरू, सिताफळ, डाळींब यासारखी लहान आकाराची किंवा शेवग्यासारखी कमी पानांची झाडे लावणे शक्य आहे. शिवाय शेताभोवती झाडाचे पट्टे निर्माण केले तर वादळ वाऱ्यापासून पिकांना संरक्षण मिळते. तसेच आवश्यक तो प्राणवायू, नत्रवायू आणि नैसर्गिक खते सहजपणे मिळू शकतात आणि उत्पादनाचे प्रमाण अशा प्रकारच्या वनशेतीमधून हमखास वाढू शकते हे अनुभवाने सिद्ध झाले आहे. यातून असे सत्य समोर येते की, कृषिसंस्कृतीला वनशेतीची जोड दिली तर शेतकऱ्याची उन्नती घडून येऊ शकते.

शेतकरी आत्महत्या एक ज्वलंत प्रश्न :

ग्रामीण जीवनातील समस्यांमध्ये सर्वांत ज्वलंत असणारी समस्या म्हणजे शेतकऱ्यांच्या आत्महत्या. शेतकऱ्यांच्या आत्महत्यास अनेक कारणे असतात, जसे की आर्थिक समस्या, शेतीवरील अस्मानी-सुलतानी संकट, कौटुंबिक समस्या, शासनाचे दुर्लक्ष, वीज- पाणी समस्या इत्यादी. मात्र शेतकऱ्यांच्या आत्महत्या हे कोणत्याच समस्येचे उत्तर होऊ शकत नाही. ग्रामीण जीवनात शेतकऱ्यांच्या आत्महत्या का होतात? या प्रश्नाचा मागोवा घेताना मराठी कविनी ग्रामीण जीवनातील नानाविध समस्यांचा त्यांच्या कवितेतून उहापोह तर केलेला आहेच. तर काही कवींनी शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा परिणाम त्यांच्या कुटुंबावरही कसा होतो याचे विदारक चित्र मांडले आहे, याअनुषंगाने कवी विठ्ठल वाघ 'साहेबराव पाटील' या कवितेत शेतकऱ्याच्या आत्महत्येचा विषय दाहकतेने मांडताना लिहितात :

"खरं म्हनजे साहेबराव तुया आत्महत्या केलीच नाही.

आमीच तुहा खून केला... तुहा अन् तुह्या बायकोपोराईचाही.'

(काया मातीत मातीत - पृ.३६)

अशा साहेबरावाच्या आत्महत्येमुळे कुटुंबावर संकट कोसळलेले आहे याचेही वर्णन या कवितेत केलेले आहे. ही साहेबरावांची आत्महत्या एक वास्तवातील घटना आहे. याचेही स्पष्टीकरण देताना प्रा. डॉ. मधुकर वाकोडे कवी विठ्ठल वाघासंबंधी लिहितात, 'समाजाभिमुख कवीच समस्याग्रस्तांच्या वेदनांनी विव्हळ होतो. न परवडणाऱ्या शेतीमुळे कुटुंबाची ससेहोलपट झाल्याने यवतमाळ जिल्ह्यातील चिलगव्हाणच्या साहेबराव पाटील नावाच्या कास्तकाराने १९ मार्च १९८६ साली कुटुंबासह, वर्धा जिल्ह्यातील दत्तपूर गावी हौतात्म्य पत्करले आणि कृषीपरंपरेपासून कायमची 'मुक्ती' मिळविली. चिलगव्हाणचा साहेबराव पाटील गांधर्व महाविद्यालयाचा संगीत विशारद....

एक संवेदनाक्षम कास्तकार होता. पहिल्यांदा झिंक फॉस्फेट मिसळलेली भजी त्याने सर्व मुलांना खाऊ घातली. नंतर डेमॉक्रॉन हे आंतरप्रवाही विष मुलांना पाजले. रात्री १० वाजता हे मृत्यूचे थैमान सुरू झाले आणि अखेर पहाटे पहाटे थांबले. चार कोवळी मुले व पत्नी यांच्यासह साहेबराव पाटलाने जगाचा निरोप घेऊन मृत्यूपत्र मागे ठेवले-

"एका शेतकऱ्याचे हाल या बलिदानातून सादर व्हावेत हीच या मृत्यूपत्राची कथा आहे. पत्रकार व पंतप्रधानांना ही वार्ता कळवा की शेतकऱ्यांसाठी मी सहा लोकांचे बलिदान करीत आहे."

"आग उरात पेटते होते जीवापार ताप आसवाचा जीव देते दोही डोयातून शाप'

ग्रामीण भागामध्ये शेतकऱ्याच्या आत्महत्या आजही मोठी समस्या ह्याच वास्तववादी जाणिवा मांडत कवी जगदीश कदम म्हणतातः

"आली नदीवर उभी काठावर मन थाऱ्यावर नव्हतेच मनावर गोटा तिनं ठेवलेला पाय रवलेला उचलला संथ पाण्यामंदी आरोळी कोणाची

खारीच्या पिलाची मायसंगं' (रास आणि गॉडर - पृ. ५०)

आजचा शेतकरी मोठ्या प्रमाणात संकटात सापडलेला आहे शेतीत केलेल्या मेहनतीतून त्याला काहीच मिळत नाही त्यामुळे तो हतबल होतो आणि दारिद्य कर्जबाजारीपणा किंवा नैसर्गिक संकटे आपत्ती यामुळे तो आपली जीवन यात्रा संपविताना दिसतो याला जबाबदार कोण तर आजच्या जागतिकीकरणाच्या कालखंडात देखील त्याला महत्त्वपूर्ण सोयी-सुविधा मिळत नाही. आधुनिक शेतीची माहिती त्याला नसल्याने तो सातत्याने होरपळतो आहे त्यामुळे आपली जीवन यात्रा संपवण्याच्याच मार्गावर असतो; मात्र सर्वच कष्टकरी शेतकरी वर्गाने या गोष्टी केल्या तर जमीन असणारा वर्ग कमी होणार आहे आणि शिवाय त्यांची कुटुंबाचे कुटुंब उद्ध्वस्त झाल्याशिवाय राहणार नाही त्यामुळे शासन प्रशासनाने शेतकरी वर्गाच्या जीवन बदलासाठी आवश्यक ती पावले उचलून त्यांना दळणवळणाची साधने आणि भौतिक सुविधा उपलब्ध करून देणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे शेतकरी आत्महत्या थांबण्यास देखील मदत होईल शेतकरी जगला तर देश जगेल कुटुंब जगेन याचा गांभीर्याने विचार शासन व्यवस्थेने करणे महत्त्वपूर्ण आहे परंतु शेतकरी वर्गाने देखील एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात घेतली पाहिजे की, आपण संपूर्ण उपयोग नाही तर त्यासाठी शाश्वत ध्येयधोरणे अमलात आणण्याची आवश्यकता ओळखली पाहिजे जेणेकरून त्यात आर्थिक सुबत्ता कशी मिळेल आणि आपले जीवन सुखकारक कसे होईल? हे ध्यानात घ्यावे. आत्महत्या हा त्यावरील पर्याय नाही हे शेतकरी बांधवांनी ओळखणे काळाची गरज आहे. याच जीवन जाणीवेतून मराठी ग्रामीण कवितेत शेतकऱ्याच्या आत्महत्या एक ज्वलंत प्रश्न कसा बनला आहे? या प्रकारची मांडणी होताना दिसते.

उपरोक्त काव्यातून कवी जगदीश कदम शेतकऱ्यांच्या जीवनातील दारिद्याचे आणि दारिद्यातून शेतकऱ्याची पत्नी महालक्ष्मीच्या सणाच्या दिवशी आत्महत्या करते अशी मन सुन्न करणारी 'सण' ही कविता मांडली आहे. यास्तव यामुळेच वसंत आबाजी डहाके म्हणतात, 'शेतकऱ्यांच्या बोलीतून, शेतकऱ्यांच्या सुख-दुःखात्मक-विशेषतः दुःखात्मक-जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण 'रास आणि गोंडर' मधल्या कवितांमधून झालेले आहे." यावरून असे दिसून येते की, ग्रामीण भागांच्या समस्यांमध्ये शेतकरी आत्महत्या एक गहन समस्या निर्माण झालेली आहे. या संदर्भातील जाणिवा कविंनी मोठ्या तळमळीने मांडलेल्या दिसून येतात.

**समारोप**:

ग्रामीण कविंनी त्यांच्या काव्यात सामाजिक जाणिवा मांडताना ग्रामीण भागातील अज्ञान, दारिद्‌य, सुख-दु:खाचे प्रसंग, तरूण सुशिक्षित शेतकरी पिढी व त्यांच्या समस्या, ग्रामीण स्त्री विश्वातील आई, बहीण, अर्धांगिणी यांच्या मनाच्या मर्मभावनांचा आविष्कारही कवी सामाजिक वास्तवतेच्या अंगाने मांडताना दिसतात. विशेषतः कवयित्री बहिणाबाई चौधरी, गिरीश, कवी ना.धों. महानोर, आनंद यादव, इंद्रजित भालेराव, फ.म. शहाजिंदे, जगदीश कदम, संतोष पद्माकर पवार, अजय कांडर, ऐश्वर्य पटेकर, कल्पना दुधाळ, संजीवनी तडेगावकर शेतकरी जीवनातील दु:ख, दारिद्‌य व कर्जबाजारीविषयक जाणिवा प्रखरतेने मांडताना दिसून येतात. ग्रामीण जीवनातील सामाजिक जाणिवांच्या अंगाने शेतकऱ्याच्या आत्महत्या, शिक्षणाचा अभाव, दळणवळणाच्या सुविधांचा अभाव, स्त्रीविश्वातील समस्या आणि अस्मानी-सुलतानी संकट अशा विविध स्वरूपात प्रकट होणाऱ्या शेती संस्कृतीतील वास्तवता कवी ग्रामीण बोलीभाषेत मांडताना दिसून येतात. कष्टकरी, शेतकरी वर्गाला दैनंदिन जीवनामध्ये नानाविध समस्या घेऊन जगावे लागते. भारताला स्वातंत्र्य मिळवून अनेक वर्ष लोटून गेली असली तरी आजही ग्रामीण भागात मूलभूत सुविधा पोहोचलेला नाहीत. तेव्हा त्यांचे जगणे असह्य होते. परिणामी या समस्या ग्रामीण भागा निर्माण झालेले आहेत. शासन आणि प्रशासनाने याची दखल घेऊन त्या सोडवणे अत्यंत आवश्यक आहे. या व अशा अनेक जीवनाच्या संदर्भात मराठी ग्रामीण कवितेतून प्रश्नांची मांडणी झालेली आहे.

## संदर्भ:


1. लुलेकर प्रल्हाद, 'साठोत्तरी साहित्य प्रवाह भाग १', सायन पब्लिकेशन्स प्रा. लि. पुणे, प्र. आ. २०१४, पृ.३५.
2. जाधव वामन, 'ग्रामीण साहित्यः प्रवाह आणि परिस्थिती', स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, प्र. आ. २०१३, पृ. २१. प्र.आ. २०१३, पृ.२१.
3. देशमुख श्रीकांत, "महानोरांची कविता (समीक्षा, लेख, टिपणे)', निर्मल प्रकाशन नांदेड, द्‌वि. आ. २०१४, पृ. २५०.
4. वाकोडे मधुकर (संपादक), "काया मातीत मातीत विठ्ठल वाघ यांची निवडक कविता', देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा.लि. पुणे, प्र.आ. १९९१, प्रस्तावना, पृ. ११.
5. ठोकळ ग.ल., सुगी, (संपा.) श्री लेखन वाचन भंडार, पुणे, चौथी आवृत्ती 1995, पृ. 88
6. तौर पृथ्वीराज, "साहित्यकारण', इसाप प्रकाशन नांदेड, प्र. आ. २०१७, पृ. ९२,९३.
7. देशमुख गणेश (कार्यकारी संपादक), "ग्रामवेद महाराष्ट्रीय ग्राम जीवनाचे सर्वांगीण चिंतन', के. बी. रोहमारे, स्मृति-ग्रंथ प्रकाशन समिती, कोपरगाव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र), प्र. आ. १९९८, पृ. १७२.
8. कदम जगदीश, 'रास आणि गोंडर', निर्मल प्रकाशन नांदेड, प्र. आ. १९९८, अभिप्राय, पृ.६९.